न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रतिबंधित क्षेत्रात अनधिकृत बांधकामे जोमात

## क्षेत्रीय कार्यालियाने कारवाई न केल्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बांधकामांना पालिकेचा पाठिंबा

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड आणि दिघी येथे दारूगोळा भांडार संरक्षण भिंतीच्या परिघापासून दोन हजार यार्ड संरक्षित क्षेत्र (नो डेव्हलपमेंट झोन) संरक्षण मंत्रालयाने जाहीर केले आहे. त्या प्रतिबंधित केलेल्या परिसरात बेकायदेशीर बांधकामे मोठ्या प्रमाणात होत आहेत. या अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर महापालिकेडून कोणतीही कारवाई करण्यात न आल्याने या बांधकामांना पालिकेचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बळ मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिबंधित क्षेत्रात बांधकामे करणाऱ्यांवर एफआयआर दाखल करून बांधकामे त्वरित थांबवण्याचे निर्देश द्यावेत, असे पत्र महापालिका संरक्षण विभागातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिले असून या पत्रात त्यांना वैयक्तिक लक्ष घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

भारत सरकारच्या संरक्षण कायदा १९०३ मधील अन्वये ७ नुसार संरक्षण मंत्रालयाने राजपत्र २६ डिसेंबर २००२ मध्ये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेने देहूरोड, दिघी मध्ये दारूगोळा भांडार संरक्षण भितींच्या परिघापासून संरक्षित क्षेत्र (नो डेव्हलपमेंट झोन) जाहीर केलेले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीलगत दिघी आणि देहूरोड दारूगोळा भांडार डेपोपासून बाह्य परिमितीपासून दोन हजार यार्डाचे क्षेत्र प्रतिबंधित केले आहे. तो सर्व परिसर 'नो डेव्हलपमेंट झोन' म्हणून जाहीर केलेला आहे. यामध्ये महापालिका हद्दीतील किवळे, रावेत, निगडी, तळवडे, चऱ्होली, दिघी भागातील परिसर प्रतिबंधित क्षेत्रात येत आहे.

देहूरोड आणि दिघी प्रतिबंधित क्षेत्रात महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागातून कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे शेकडो इमारतींचे बांधकाम सुरू आहे. तसेच डेपो परिमितीपासून शंभर मीटर अंतरावर तळवडे भागात नवीन बांधकामे करण्यात येत आहेत. विनापरवानगी बांधकामे करणाऱ्यावर महापालिका कोणतीही कारवाई न करता केवळ नोटीस देत आहे. त्यांची बांधकामे पाडली जात



नाहीत. तसेच त्यांची एफआयआर देखील दाखल केली जात नाही.

अनधिकृत /बिगरपरवाना बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६१,२६४, २६७ व ४७८ मधील तरतुदीनूसार महापालिका आयुक्त यांचे आदेश क्र.अति/३/कावि/१०७/२०१२ अन्वये पदनिर्देशित अधिकारी म्हणून कारवाई करण्याचे अधिकार क्षेत्रीय अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. तरी देखील त्या अनधिकृत बांधकामांवर हातोडा टाकून बांधकामे पाडण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकारी यांच्यावर असताना त्यांनी कर्तव्यापासून पळ काढत व जबाबदारी झटकून राजकीय दबावापोटी संबंधित अनधिकृत बांधकाम निष्काषित करण्याकडे दुर्लक्ष केल्याने त्या बांधकामाना अभय मिळत आहे.

दरम्यान, देहूरोड भांडार डेपोच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून तळवडेतील ज्योतिबानगर, रुपीनगर परिसरात प्रतिबंधित क्षेत्रात आरसीसी बांधकामे सुरू आहेत. संबंधित व्यक्तीला बांधकाम थांबवण्याचे निर्देश दिले. त्यानंतर क्षेत्रीय कार्यालयात पत्राद्वारे कळवले होते. तरीही क्षेत्रीय कार्यालयाकडून बांधकामावर कारवाई झाली नाही. त्यामुळे सदरचे बांधकाम सुरू ठेवण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा मिळत आहे.

त्यामुळेच डेपोच्या प्रशासकीय अधिका-यांकडून ११ ऑक्टोबर २०२३ रोजी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र पाठवण्यात आले. त्यानुसार प्रतिबंधित क्षेत्रात बेकायदेशीर बांधकाम सुरू असल्याचे निर्देशनास आणून दिले आहे. त्या पत्रात तळवडेतील एका माजी नगरसेवकांसह आणखी सहा नागरिक प्रतिबंधित क्षेत्रात अनधिकृत बांधकामे करत असून त्यांच्यावर तातडीने एफआयआर दाखल करून सदरची बांधकामे निष्काषित करावेत, असे पत्र पालिका आयुक्त सिंह यांना दिले. मात्र, त्या पत्रावर महापालिका आयुक्तांकडून क्षेत्रीय कार्यालयास कुठलेही निर्देश दिले नाहीत. त्यामुळे अनधिकृत बांधकाम आणखी पाठबळ मिळू लागले आहे.

### हे सर्वेक्षण लवकर पूर्ण करा - न्यायालयाचे निर्देश

दारूगोळा कारखान्याचे प्रतिबंधित परिसरात बेकायदा बांधकामांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने संरक्षण मंत्रालयासह पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले आहेत. हा मुद्दा केवळ बेकायदा बांधकामांपुरता मर्यादित नाही, तर संरक्षण मंत्रालयाच्या जागेवर अतिक्रमण करण्याशीही संबंधित असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. तसेच हे सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण करण्याचे न्यायालयाने म्हटले आहे. या इमारती म्हणजे अनियमित शहरी नियोजनाचा भाग असून अशाप्रकारे प्रतिबंधित परिसरात इमारती बांधून मानवी जीवन धोक्यात घालणे चुकीचे आहे. अशी टिप्पणीही न्यायालयाने केली होती. तसेच संरक्षण मंत्रालय, राज्य सरकार, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांचे आयुक्त आणि पुणे जिल्हाधिकारी यांनी बैठक घेऊन या समस्येवर व्यवहार्य तोडगा काढण्याचे आदेश दिले.

# सर्वांच्या साथीने विजयाची गुढी उभारणार

## मतदारसंघात विकासाची, जनसेवेची आणि जनकल्याणाची गुढी उभारु : संजोग वाघेरे पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदार संघात पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी “मशाल” पेटवून आपल्याला विकासाची, जनसेवेची आणि जनकल्याणाची गुढी उभारु, असे आवाहन करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी जनतेला गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

लोकसभा निवडणुकांचे वारे देशात आणि राज्यात वाहत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील हे मावळ लोकसभा



मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. गुढीपाडवा आणि नववर्षाच्या निमित्ताने मावळ लोकसभा मतदारसंघातील नागरिकांना शुभेच्छा देताना त्यांनी सर्वांच्या साथीने विजयाची गुढी उभारणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

ते म्हणाले की, मावळ लोकसभा मतदारसंघात परिवर्तन आणि विकासात्मक बदल करायचा आहे. तो बदल करण्यासाठी आपल्या सर्वांची सोबत अतिशय महत्वाची आहे. या लोकसभा निवडणुकीत कोणाच्याही दबावाला आणि भूलथापांना बळी न पडता मतदान करावे, असे आवाहन देखील या निमित्ताने त्यांनी केली.

# देशात पहिल्यांदाच गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान

## शहरातील 35 गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे : जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी कमी मतदान असलेल्या शहरांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांत मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून असा उपक्रम देशात प्रथमच राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची मूळ संकल्पना पुणे जिल्ह्याची असून पुणे शहरातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे स्थापन करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

जिल्ह्यातील ४ लोकसभा मतदार संघांच्या निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम सुरू आहे. त्यानुसार बारामती लोकसभा मतदार संघाची अधिसूचना १२ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार आहे तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १९ एप्रिल २०२४ अशी आहे. बारामती मतदार संघात नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम मुदत २२ एप्रिल आहे. पुणे, शिरूर आणि मावळ मतदार संघांची अधिसूचना प्रसिद्धी १८ एप्रिल रोजी, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत २५ एप्रिल तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत २९ एप्रिल २०२४ अशी आहे.

आजपर्यंत पुणे जिल्ह्यात ४३ लाख २८ हजार ९५४ पुरूष, ३९ लाख ६३ हजार २६९ स्त्री तर ७२८ तृतीयपंथी अशा एकूण ८२ लाख ९२ हजार ९५१ मतदारांची नोंद झाली आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी अर्ज क्र. ६, आणि स्थलांतरणासाठी अर्ज क्र. ८ सादर करण्याची अद्यापही संधी असून बारामती मतदार संघात ९ एप्रिलपर्यंत तर अन्य तीन मतदार संघात १५ एप्रिलपर्यंत आलेल्या अर्जांवर निवडणूक प्रशासनाकडून कार्यवाही केली जाणार आहे. अंतिम मतदारसंख्या त्यावेळी निश्चित होईल.



सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. ५ किंवा ५ पेक्षा जास्त मतदान केंद्रे असलेल्या इमारतीमध्ये वाहनतळाची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, पाळणाघर, स्त्रीयांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह आदी ठळक सुविधांसह अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. मतदारांना मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी शहरी भागात प्रत्येक वॉर्ड कार्यालयात मदत केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट वितरणाचे कामकाज कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या गोदामातील मतदान यंत्र वितरण केंद्रातून राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत वितरण सुरू झाले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे आणि बारामती लोकसभा मतदार संघाची मतमोजणी कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या गोदामात तर शिरूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रांजणगाव (कोरेगाव) औद्योगिक वसाहतीतील महाराष्ट्र वखार महामंडळाच्या गोदामात होणार आहे. सर्व मतमोजणी केंद्राची प्रशासन, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, अग्नीशमन यंत्रणा आदी विभागांनी सुरक्षेतेच्यादृष्टिने संयुक्त पाहणी केली आहे.

प्रत्येक विधानसभा मतदार संघात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम हाताळणीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. निवडणूकीच्या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असून लोकसभा निवडणूक शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व नियोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# आकर्षक क्रमांकासाठी लाखो रुपयांचा खर्च!

## आरटीओला आकर्षक क्रमांकातून 49 कोटींचा महसूल : एक क्रमांक सर्वाधिक महागडा

**पुणे | प्रतिनिधी**

वाहनाला आकर्षक नोंदणी क्रमांक मिळविण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करणाऱ्या पुणेकरांची संख्या आता वाढली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) आकर्षक वाहन नोंदणी क्रमांकांतून आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये सुमारे ५० कोटी रुपयांचा महसूल मिळविला आहे. गेल्या वर्षभरात एक क्रमांक सर्वाधिक महागडा ठरला असून, त्यासाठी १२ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

महागडी मोटार खरेदी केल्यानंतर तिला क्रमांकही आवडीचा हवा, अशी अनेकांची हौस असते. त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्याची त्यांची तयारी असते. यामुळे आरटीओकडून आर्थिक वर्ष २००४-२००५ पासून आकर्षक क्रमांकांचा लिलाव करण्यास सुरुवात झाली. त्यातून प्रादेशिक परिवहन कार्यालयाला मिळणारा महसूल वर्षानुवर्षे वाढत आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये आरटीओला आकर्षक क्रमांकातून ४९ कोटी ८२ लाख ८४ हजार ७३८ रुपयांचा महसूल मिळाला. त्याआधीच्या वर्षात हा महसूल ३८ कोटी १९ लाख ६५ हजार ४९५ रुपये होता. त्यात आता २५ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदविण्यात आली आहे.

पुण्यात गेल्या आर्थिक वर्षात सर्वाधिक पैसे एक क्रमांकातून मिळाले आहेत.




> वाहनचालकांकडून आकर्षक क्रमांकांना मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. प्रामुख्याने १, ९ आणि १२१२ क्रमांकाना पसंती दिसून येत आहे. आकर्षक क्रमांकातून सरकारला मिळणाऱ्या महसुलातही वाढ झालेली आहे.
> **- संजीव भोर, प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

एक क्रमांकासाठी मोटारींच्या क्रमांक मालिकेत ४ लाख रुपयांचे शुल्क आहे. तोच क्रमांक इतर वाहनांच्या मालिकेतून घेतल्यास तिप्पट म्हणजेच १२ लाख रुपयांचे शुल्क भरावे लागते. एक क्रमांकासाठी सर्वाधिक शुल्क असून, इतर क्रमांकासाठी वेगवेगळे शुल्क आहे.

पुणेकरांची सर्वाधिक पसंती असलेल्या क्रमांकामध्ये १, ९, ९०९, ९९९, ९९९०, ९९९९, ७, ७७७, ७००७, ७७७७, १२, १२१२, ४१४१, २१२१, ७२७२, ५५५, ५५५५, ४४४४, ९६, १००, ५००, ५०५, १००१, ११११, ३००३, ५०५०, ५१५१ यांचा समावेश आहे.

# लांडेंच्या भेटीतून आढळरावांचे पारडे जड

## बिजलीनगर, चिंचवड परिसरात संजोग वाघेरेंच्या गावभेट दौऱ्यास प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज झालेल्या भोसरीतील माजी आमदार विलास लांडे यांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केला आहे. लांडे यांची नाराजी दूर करण्यात आढळरावांना यश आल्यास त्यांच्या ते पथ्यावर पडणार आहे. महायुतीचा धर्म पाळल्यास भोसरीतून आढळरावांना मोठे मताधिक्य मिळेल असे राजकीय गणित जाणकारांकडून मांडण्यात येत आहे.

महायुतीमधील अजित दादांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून शिरूरसाठी उमेदवारी मिळेल असा आडाखा माजी आमदार विलास लांडे यांनी बांधला होता. दरम्यानच्या काळात उमेदवारीवरून राजकीय घमासान झाले. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या बाबत मतदारसंघ विजयी होण्यासाठी अनुकूल असल्याचे स्पष्ट झाले त्यामुळे राष्ट्रवादीत पक्षप्रवेश घडवून आणत त्यांना उमेदवारी देखील बहाल करण्यात आली. या निर्णयामुळे भोसरीचे चाणक्य असलेले विलास लांडे नाराज झाले. उमेदवारी आढळरावांना जाहीर झाल्यापासून ते राजकीय विजनवासात गेल्याचे चित्र होते. माध्यमांना त्यांनी त्यानंतर प्रतिक्रिया दिल्या नाहीत. तसेच राजकीय सार्वजनिक कार्यक्रमांना दांडी मारण्यास त्यांनी सुरुवात केली.

भोसरी विधानसभेत तब्बल पाच लाखांपेक्षा अधिक मतदार आहेत. या मतदारसंघात असणारे विलास लांडे हे महत्वाचे आणि मोठे नेते आहेत. लांडे नाराज झाले तर त्याचा निवडणुकीत मोठा फटका बसू शकतो याची जाणीव आढळराव पाटील यांना आहे. त्यामुळे त्यांनी भोसरी येथील राजमाता जिजाऊ महाविलयातील कार्यालयात जाऊन लांडे यांची भेट घेतली. त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विविध माध्यमांना प्रतिक्रिया देताना लांडे यांची नाराजी दूर झाल्याचे नरेटिव्ह तयार करण्याचे काम आढळराव पाटील यांनी केले. सोशल मीडियावर देखील लांडे आणि आढळराव यांच्या भेटीचे फोटो व्हायरल झाल्याने त्याची चांगलीच चर्चा रंगली होती. ही चर्चा आढळरावांना सकारात्मक ठरेल असे सांगितले जात आहे. प्रत्यक्ष त्याचा निवडणुकीत किती फायदा होतो पाहणे रंगतदार ठरणार आहे.

लांडे यांची नाराजी दूर झाल्याने शिवाजीराव आढळराव पाटील यांना मोठा दिलासा मिळणार आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणेच आढळरावांना मतांची मोठी आघाडीची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



### म्हणून लांडे सोबतीला असणे गरजेचे

गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत माजी आमदार विलास लांडे यांना ९० हजार मते पडली आहेत. त्यांचा पराभव झाला खरा. मात्र त्यावेळी त्यांच्या राजकीय खेळ्या चांगल्याच चर्चेत राहिल्या होत्या. अपक्ष म्हणून निवडणूक लढविताना त्यांनी अजित दादांची मनधरणी करत राष्ट्रवादीच्या उमेदवाराला अर्ज भरायच्या पाच मिनिटे आधीच माघार घ्यायला लावली. थेट चिन्हावर आणि पक्षावर न लढताही त्यांनी वरिष्ठांचा आशीर्वाद आपल्या बाजूने ठेवण्याची किमया केली होती. त्यांच्या या राजकीय खेळ्या अनेकांच्या अडचणीच्या ठरू शकतात याची जाणीव आढळराव पाटील यांना होती. त्यामुळे आधीच भेट घेऊन त्यांची मनधरणी करत लांडे यांची ताकद आपल्या बाजूने ठेवण्याची गरज आढळरावांना देखील निर्माण झाल्याची चर्चा आहे.

# वाहतूक पोलिसाच्या अंगावर घातली मोटार

## भरधाव चारचाकी वाहनाने उडवले : वाहतूक पोलीस गंभीर जखमी

**पिंपरी | प्रतिनिधी**

दुपारच्या सुमारास चऱ्होली गावाकडून आरोपी प्रशांत चारचाकी वाहन भरधाव वेगात घेऊन आला. या वाहनाला काळ्या काचा होत्या.

वाहतूक नियमन करत असलेल्या वाहतूक पोलिसाला भरधाव चारचाकी वाहनाने उडवले. यात वाहतूक पोलीस गंभीर जखमी झाले असून पुण्यातील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. राहुल मोटे (वय ३०) असे गंभीर जखमी झालेल्या वाहतूक पोलिसाचे नाव आहे. प्रशांत संतोष कदम (वय २० रा. निरगुडी, हवेली) असे अटक केलेल्या वाहनचालकाचे नाव आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत पोपटराव टेमगिरे (वय ३९) यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलीस शिपाई मोटे हे दिघी आळंदी वाहतूक विभागात कार्यरत आहेत. चऱ्होली गावातून अजिंक्य डी. वाय. पाटील महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सोमवारी ते सहकारी पोलिसांसह वाहतूक नियमन करत होते.

दुपारच्या सुमारास चऱ्होली गावाकडून आरोपी प्रशांत चारचाकी वाहन भरधाव वेगात घेऊन आला. या वाहनाला काळ्या काचा होत्या. त्यामुळे पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रशांत याने वाहन दामटले. त्यामुळे पोलीस शिपाई मोटे यांनी पुढे होऊन वाहन चालकाला थांबण्याचा इशारा केला. त्यावेळी चालकाने भरधाव चारचाकी मोटे यांच्या अंगावर घातली. यात मोटे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या डोक्याला, खांद्याला, पायाला मार लागला असून पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



नियमानुसार मुख्यमंत्री, कॅबिनेट दर्जाचे मंत्री, राज्यमंत्री, झेड आणि वाय सिक्युरिटी असलेल्या व्यक्तींच्या वाहनांवर काळ्या काचा लावण्याची परवानगी आहे. खासदार, आमदार, महापौर, नगरसेवकांना अशी परवानगी नाही. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षकांना वाहनांच्या काचावर काळी फिल्म लावायची असल्यास न्यायालयाच्या सूचनेनुसार स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीची परवानगी घ्यावी लागते. परंतु या समितीकडून परवानगी न घेता सर्रास काचांवर फिल्म चढवल्या जात आहेत. विशेष म्हणजे राजकीय व्यक्ती किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर एकदाही कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

स्कूल बस, कार, कंपनीच्या बसेस, खासगी वाहने, काळी-पिवळी अशा सर्वच वाहनांच्या काचांवर काळी फिल्म चढवण्यात आली आहे. शहरात चार प्रकारच्या फिल्म उपलब्ध आहेत.

### काळ्या काचांवर कारवाई...

» काळ्या काचांवर कारवाई वेळी एक पोलीस उपनिरीक्षक तसेच तीन अंमलदार होते. दरम्यान, दुपारी पावणेबाराच्या सुमारास चऱ्होली गावाकडून एक चारचाकी वाहन भरधाव वेगात आले. या वाहनाला काळ्या काचा होत्या. त्यामुळे पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने वाहन दामटले. त्यामुळे पोलिस अंमलदार राहुल मोटे यांनी पुढे होऊन वाहन चालकाला थांबण्याचा इशारा केला. त्यावेळी चालकाने भरधाव चारचाकी राहुल मोटे यांच्या अंगावर घातली. यात राहुल गंभीर जखमी झाले. त्यांना पुणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी दिघी पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

# वरंध घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद

## 8 एप्रिल ते 30 मे 2024 पर्यंत वरंध घाटातील रस्ता वाहनांसाठी बंद : जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

8 एप्रिल पासून ते 30 मे 2024 पर्यंत वरंध घाटातील रस्ता सर्व प्रकारच्या अवजड व लहान मोठ्या वाहनांसाठी बंद करण्यात आला आहे. हा घाट वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

जिल्हा हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ वरील मौजे वरंध ते रायगड जिल्हा हद्दीत प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम, संरक्षण भिंत बांधण्याची व आवश्यक सुरक्षा उपाय योजना करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे दि. 8 एप्रिल पासून ते 30 मे 2024 पर्यंत वरंध घाटातील रस्ता सर्व प्रकारच्या अवजड व लहान मोठ्या वाहनांसाठी महामार्ग वाहतूकीसाठी बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग ९६५ डीडी किमी ८८/१०० (राजेवाडी) ते किमी ९६/७०० (रायगड जिल्हा हद्द) या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम संरक्षण भिंती बांधण्याची व आवश्यक सुरक्षा उपाय योजना करण्यासाठीची कामे प्रगतीत आहे. वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्दीमध्ये संरक्षक भिंतीचे काम प्रगतीत असून बहूतांश काम पूर्ण झालेले आहे. परंतू साखळी क्रमांक ८८/१०० (मौजे वरंघ) ते ९६/७०० (रायगड जिल्हा हद्द) या लांबीमध्ये काम सुरु करावयाचे आहे.



सदरच्या लांबीमध्ये खोल दरी व उंच डोंगर असून रस्त्याची रुंदी काम करावयास अपुरी आहे. सदरच्या लांबीमध्ये चालू वाहतूकीमध्ये काम करताना अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. वाहतूक चालू ठेवल्यास ते शक्य होणार नाही सदर कालावधीकरीता वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करणेबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण आणि पोलीस अधीक्षक रायगड यांनी केलेल्या विनंतीनुसार जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.

वरंध घाटातील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करणेबाबत तसेच सदरवेळी पर्यायी मार्ग वापराबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. नागरिकांनी पुण्याकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-माणगांव-निजामपूर रोड-ताम्हाणी घाट-मुळशी पिरंगुट पुणे व पोलादपूर आंबेनळी घाट वाई मार्गे पुणे असा मार्ग वापरावा तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळुण-पाटण-कराड- कोल्हापूर" असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम केले जात आहेत. आवश्यक सुरक्षा उपाय योजना करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे 8 एप्रिल ते 30 मे 2024 पर्यंत वरंध घाटातील रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद करण्यात आला आहे.

### हा असणार पर्याय

» पुणे येथून भोरमार्गे महाडला जाण्यासाठी जवळचा पर्याय असणारा वरंधा घाट बंद होत आहे. आता एप्रिल, मे महिन्यात वरंधा घाट बंद करण्यात आला आहे. आता हा घाट बंद केल्यामुळे वाहनधारकांना ताम्हिनी घाटाचा पर्याय असणार आहे. नागरिकांनी पुण्याकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-माणगाव-निजामपूर रोड-ताम्हाणी घाट-मुळशी पिरंगुट पुणे व पोलादपूर आंबेनळी घाट वाई मार्गे पुणे असा मार्ग वापरावा. तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा- पोलादपूर-खेड-चिपळुण-पाटण-कराड- कोल्हापूर" असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे. पारमाची वाडी ते रायगड जिल्हा या ठिकाणी रस्त्याचे काम आता सुरु करण्यात येत आहे. या रस्त्यात दरी व उंच डोंगर आहे. तसेच रस्त्याची रुंदी कामी आहे. राज्य परिवहन महामंडळाने वरंधा घाटातून वाहतूक यापूर्वीच बंद केली आहे. भोर, पुणे डेपो व इतर डेपोंच्या एस.टी.बसेस वरंधा घाटातून गेल्या आठ दिवसांपासून जात नाही. आता सर्वच वाहनांसाठी वरंधा घाट बंद झाल्यामुळे कोकणात जाणाऱ्या पर्यटक आणि प्रवाशांना दुसऱ्या मार्गाने जावे लागणार आहे.

# ऐन उन्हाळ्यात विजेच्या लपंडावाने पुणेकर त्रस्त

## वारंवार वीजपुरठा खंडित : परिसरातील नागरिक व व्यावसायिकांना मोठा मनस्ताप

**पुणे | प्रतिनिधी**

महावितरणच्या मंडई येथील उपकेंद्राला वीजपुरवठा करणारी भूमिगत वीजवाहिनी पुणे महापालिकेने केलेल्या पाइपलाइन खोदकामासाठी १५ दिवसांपूर्वी तोडली होती. त्याच ठिकाणी पुन्हा रविवारी रात्री ९ वाजता बिघाड झाला. त्यामुळे मंडई परिसरातील तुळशीबाग, शनिपार, विश्रामबागवाडा आदी परिसरात खंडित झालेला १५०० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. वारंवार वीजपुरठा खंडित होत असल्याने या परिसरातील नागरिक व व्यावसायिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दरम्यान, मंडई उपकेंद्राला वीजपुरवठा करणाऱ्या पर्यायी वीजवाहिनीच्या दुरुस्तीसाठी ५ मीटर खोदाई करणे आवश्यक आहे. त्यासाठी दि. १ एप्रिलला महावितरणकडून लेखी परवानगी मागण्यात आली. मात्र, पालिकेकडून ती मिळाली नसल्याने पर्यायी स्वरूपात वीजपुरवठा उपलब्ध करून देता आला नाही, असे महावितरणचे म्हणणे आहे.

पर्वती विभागांतर्गत मंडई उपकेंद्रातून मंडई, तुळशीबाग, लक्ष्मी रोड आदी परिसरातील सुमारे १७ हजार ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. या उपकेंद्राला रास्तापेठ व नवी पेठ या दोन स्वतंत्र २२ केव्ही भूमिगत वाहिन्यांद्वारे वीजपुरवठ्याची सोय



आहे. दरम्यान, १५ दिवसांपूर्वी यातील रास्तापेठ वीजवाहिनी पुणे महानगरपालिकेच्या पाइपलाइनच्या खोदकामात तोडण्यात आली होती. संबंधित कंत्राटदाराने या वाहिनीच्या दुरुस्तीचे व जोडणीचे काम केले होते. त्याच दरम्यान नवी पेठ वीजवाहिनीमध्ये बिघाड झाला. त्यामुळे मंडई उपकेंद्राच्या वीजपुरवठ्याचा पर्यायी स्रोत बंद झाला.

त्यामुळे मंडई उपकेंद्राचा वीजपुरवठा बंद पडल्याने सुमारे १७ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. यानंतर महावितरणकडून मंडई उपकेंद्राच्या ६ पैकी ५ वीजवाहिन्यांना तासाभरात अथक प्रयत्नांनी पर्यायी स्वरूपात वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात आला. मात्र, उन्हाळ्यामुळे वीजभार वाढल्याने महालक्ष्मी या वीजवाहिनीवरील तुळशीबाग, शनिपार, विश्रामबाग वाडा, नागनाथ पार येथील १५०० ग्राहकांचा वीजपुरवठा बंद ठेवावा लागला. तो सकाळच्या सुमारास पूर्ववत करण्यात आला.